


# ढोबाकट्टी

गीता धर्मराजन
वंदना बिश्त यांची चित्रे

कथाचे ३००एम थिंकबुक



सोसाट्याचा वारा,

मी


आणि माझी छोटी मैत्रिण

आम्ही धावतो आणि गातो

आणि खेळतो आणि

उंचच उंच उड्या मारतो...


क्षणात आम्ही इकडे
असतो आणि क्षणात
आम्ही तिकडे असतो
आम्ही ढगांच्या वरून आणि खालून सैरावरा पळतो
खूप जुन्या झाडाच्या नव्या नव्या पानांमधून बागडत असतो
आम्ही तरंगतो आणि बुडतो
झुर्र्र्र्र्र!
खाली, अजून
खाली, खूप
खाली, एकदम
खोल
हिरव्या हिरव्या गवतावर करतो दोबाकट्टी!
आणि नदीतलं आकाश खुदुकन हसतं




आम्ही सगळे होतो आनंदी

वारा आणि झाडे आणि
मैत्रिण आणि मी

## कृती १


### रिकामा की भरलेला?

फुगा घेऊन गंमत करूया आणि शोधूया!




एक छोटा फुगा घ्या.

2




तो नळाच्या तोटीला लावा आणि तिथेच धरून ठेवा.

3




आता हळुहळू नळ सोडा आणि फुग्यात पाणी भरा.



फुग्याचा आकार कसा बदलतो ते पाहा.

5



फुगा पूर्ण भरला की नळ बंद करा. नाही तर तो फट्टकन् फुटेल!

जेव्हा तुमचे पोट रिकामे असते तेव्हा तुम्ही काय करता? ते पूर्ण भरले आहे, हे तुम्हाला कसे समजते?



## कृती २



### तुम्ही विरुद्धार्थी ॲक्शन करू शकता?



खाली काही ॲक्शन्स आणि त्यांच्या विरुद्ध ॲक्शन्स दिल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| उभे रहा - खाली बसा | श्वास घ्या – श्वास सोडा | हात वर करा - हात खाली करा |
| झोपा - उठा | ओरडा - कुजबूज करा | रडा - हसा |

आता तुमच्या मित्रांना बोलवा आणि धमाल करा! | तुम्ही दोन गट तयार करा अ आणि ब. दोन्ही गट एकमेकांसमोर उभे राहतील. | जेव्हा अ गट ॲक्शन करेल तेव्हा ब गट त्याच्या विरुद्ध ॲक्शन करेल.

तुम्ही विरुद्धार्थी शब्दांनी अजून कोणते खेळ खेळू शकता?



## कृती ३



### उत्तर, दक्षिण, पूर्व की पश्चिम?



तुमच्यासाठी एक छान गाणे आहे, ते गा आणि त्यानुसार मित्रमैत्रिणींसोबत हावभाव करा.

एका सुंदर चिमणीची होती पिल्ले चार
फडफडायची पंख आणि करायची धमाल
एक उडालं पर्वेला उगवत्या सूर्याकडे
एक उडालं पश्चिमेला जिथे सूर्य जातो झोपायला
एक उडालं उत्तरेला बर्फाच्या दिशने
एक उडालं दक्षिणेला समुद्राकडे
संपूर्ण जगाची त्यांनी केली सफर
आणि शेवटी सगळे आले घरी परत
उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम
घर आहे सर्वात उत्तम





जेव्हा तुम्ही घरी असता तेव्हा सूर्योदय कुठल्या बाजूला होतो?



गीता धर्मराजन यांना मुलांसाठी काल्पनिक कथा आणि गोष्टी लिहायला आवडतात. त्या कथाच्या संस्थापक-संचालक आहेत. १९८८ साली त्यांनी तमाशा हे लहान मुलांसाठीचे नियतकालिक त्यांनी सुरू केले आणि त्या या नियतकालिकाच्या संपादक सुद्धा होत्या.त्या आधी लहान मुलांसाठीच्या टारगेट या नियतकालिकाच्या आणि पेनीसिल्व्हेनिया विद्यापीठातील आयव्ही लिगच्या द पेनिसिल्व्हेनिया गॅझेट या नियतकालिकाच्या संपादक होत्या. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या भरीव कामाबद्दल त्यांना २०१२ साली पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

वंदना बिश्त यांनी दिल्ली कला महाविद्यालयातून फाइन आर्ट्स शाखेतील पदवी संपादन केली आणि इलस्ट्रेशन हे त्यांचे स्पेशलायझेशन होते. त्यांची चित्रे मुलांसाठीच्या अनेक नियतकालिकांमध्ये आणि पुस्तकांमध्ये प्रसिद्ध झाली आहेत. अ टिकेट टू होम अँड अदर स्टोरीज या त्यांच्या पहिल्या पुस्तकापासून त्यांच्या कलाकृतींचे जपान आणि ब्रातिस्लाव्हा येथे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कथाने प्रकाशित केलेल्या दर प्रिन्सेस वुइथ द लाँगेस्ट हेअर या पुस्तकातील चित्रांसाठी त्यांना १९९८ साली चित्रकला पुरस्कार मिळाला होता. नोमा कॉन्कर्स फॉर पिक्चर बुक इलस्ट्रेशन्समध्ये या पुस्तकाला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले होते. वंदना या लेखिकासुद्धा आहेत आणि १९९४ साली त्यांना क्रिएटिव्ह फिक्शन विभागामध्ये कथा पुरस्कार मिळाला होता.

## KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." **- नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो."
**- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते"
**- टाइम आउट**

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" **- पेपरटायगर्स**

प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, २०१२, २०२१
मजकूराचा कॉपीराइट © गीता धर्मराजन
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.





"आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते!
(विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा)."

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

ही सर्व आयएलआर पुस्तके

इंडिगो सीरिजमध्ये

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा




































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

“गोष्टींच्या माध्यमातून बहुविध भारताची ओळख.”
- द पायोनिअर

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
` XXX